# University of Mumbai

क्र./अनिवि/आयसीडी/२०१८–१९/१६६७

परिपत्रक :

विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक व विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र.

आपणांस कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र. ८ अन्वये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

> "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५ (११) च्या अधीन राहून चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील विविध विभाग, संचालित संस्था, संचालित महाविद्यालय येथील संचालक पदासाठी सेवानिवृत्तीचे वय हे ६० असावे. सदर निर्णय सध्या कार्यरत असणाऱ्या संचालकांना देखील लागु राहील व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. सदर ठराव व्यवस्थापन परिषदेत मंजूर करण्यात आला".

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाची नोंद घ्यावी तसेच विभागातील/संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या निर्दशनास आणून देण्यात यावे.

सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(दत्ता घुगे)
उपकुलसचिव
शिनिमावि (विशि)

मुंबई : ४०० ०३२.
दिनांक २९ मार्च, २०१९.

प्रत : सर्व विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग, व्यवस्थापन परिषद दिनांक २९ जानेवारी, २०१९ बाब क्र. ८ चा कार्यवाही अहवाल.